# ‘नाशिक रन’मध्ये पंधरा हजार नाशिककर धावले



छाया : भूषण पाटील

नाशिक, दि. ११ (सा.वा.) - नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टने गोरगरीबांच्या सेवेचा वसा जोपासत सलग १८ व्या वर्षी आयोजित केलेल्या ‘नाशिक रन’मध्ये आज पंधरा हजारांहून अधिक नाशिककरांनी सहभाग नोंदविला. यावेळी प्रथमच घेण्यात आलेली दहा किलोमीटरची मॅरेथॉन स्पर्धा अडीचशेहून अधिक स्पर्धकांनी पूर्ण केली. कडाक्याच्या थंडीतही या रनसाठी हजेरी लावणाऱ्या आबालवृद्धांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

शहरातील नामवंत कंपन्यांनी एकत्रित येत सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली आहे. समाजसेवेचा हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून सलग १८ व्या वर्षी आज नाशिक रन घेण्यात आली. महात्मानगर मैदानावर पहाटेच मान्यवरांसह हजारो नाशिककरांनी उपस्थिती लावली. प्रमुख पाहुणे म्हणून बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, टीडीके इंडियाचे एन. बालाकृष्णन, महापौर सतिश कुलकर्णी, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष रमेश जी.आर., सचिव अनिल दैठणकर, राजाराम कासार, प्रबल रे, अनंत रामन, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण, मुकुंद भट आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम पहिली नाशिक रन मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. अडीचशेहून अधिक स्पर्धकांनी ही दहा किलोमीटर अंतराची स्पर्धा पूर्ण केली. त्यानंतर विविध गटांत नाशिक रन घेण्यात आली. नामवंत क्रीडापटूंच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून या नाशिक रनचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ‘आयर्नमॅन’ किशोर घुमरे यांना गौरविण्यात आले. प्रथम विशेष मुलांनी नाशिक रनचा आनंद घेतला, त्यानंतर ज्येष्ठ नागरिक धावले. रन यशस्वीतेसाठी रोहन तांदळे, संतोष जोशी, उमेश ताजनपुरे, स्नेहा ओक, अर्चना सायगावकर, आदित्य अवस्थी, जतीन सुळे, शरद गीते यांच्यासह चारशेहून अधिक स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## पहिल्या मॅरेथॉन स्पर्धेत रॅम विजेते, आयर्नमॅनही सहभागी

*नाशिक रन मॅरेथॉन स्पर्धेचे हे पहिले वर्ष होते. नाशिक जिल्ह्यातून स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्य समन्वयक विजय काकड व सहकाऱ्यांनी मॅरेथॉन स्पर्धेसाठी परिश्रम घेतले. या स्पर्धेचे ॲम्बॅसिडर ‘रॅम’विजेते डॉ. महेंद्र महाजन, डॉ. हितेंद्र महाजन, ‘आयर्नमॅन’ महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी, डॉ. अरुण गचाले, किशोर घुमरे, ‘अल्ट्रारनर’ अनिरुद्ध अथनी, नारायण वाघ यांच्यासोबतच पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी ही दहा किलोमीटर अंतराची स्पर्धा पूर्ण केली. १५ ते ३५ या महिलांच्या गटात योगिता वाघ यांनी प्रथम क्रमांक मिळविला. ३६ ते ५० गटांत अश्विनी देवरे, ५१ वर्षांपुढील गटात सुचिता पालवे अव्वल ठरल्या. पुरुषांच्या १५ ते ३५ वर्षे गटांत रोहित यादव, ३६ ते ५० वर्षे गटांत सावळीराम शिंदे आणि ५१ वर्षांपुढील गटात हरिश्चंद्र हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. महात्मानगर मैदान, जेहान सर्कल, सोमेश्वर ते पुन्हा महात्मानगर मैदान असा या मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग होता.*

Scanned by CamScanner